# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक ०६.१०.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०५.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून एकुण ४,५९५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०४ ईसमावर कारवाई करून एकुण १,४१०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ५२ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये १६ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १०४ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २८२ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ३७ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ८० केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १४ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ५६ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०८ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १५ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ३० केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,१५९ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे १० केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ३२ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,९७९ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ७,६२,२००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०५.१०.२०२६ चे ०१.४० वा. ते ०३.४५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, रामबाग परिसरातील मैत्री बुध्द विहाराजवळ एक काळया रंगाचे स्प्लेंडर दुचाकीचे बाजुला दोन इसम वय अंदाजे २५ ते ३० वर्ष हे संशयीतरित्या हालचाली करतांना दिसुन आले. त्यांचेकडे जात असता, ते पोलीसांना पाहुन पळण्याचे तयारीत असतांना, त्यापैकी एकास घेराव टाकुन ताब्यात घेतले. दुसरा इसम अंधाराचा फायदा घेऊन पळुन गेला. ताब्यातील इसमाचे पंचासमक्ष नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव सन्नी भाऊराव बागडे वय २९ वर्ष रा. मैत्री बुध्द विहारमागे, राजु मेंढेच्या घराजवळ, रामबाग, इमामवाडा, नागपूर असे सांगितले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्यांचे पॅन्टचे खिशात एका झिपलॉक पन्नीमध्ये १७.०४० ग्राम एमडी पावडर मिळुन आली. आरोपीचे

ताब्यातुन एमडी पावडर, ०१ मोबाईल फोन व एक हिरो स्प्लेंडर क्र एमएच ३१ एफएन ६८३६ असा एकुण १,४९,१२०/—रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपीस त्याचे पळुन गेलेल्या साथीदाराबाबत आणि एमडी पावडरबाबत विचारपुस केली असता, त्याचे नावे नाव दीक्षित धाबेकर वय ३० वर्ष रा. भिमचौक, अंबाझरी, नागपूर असे सांगुन, नमुद पावडर ही पाहिजे आरोपी नामे स्वप्निल उर्फ पाब्लो दिनेश निषाद वय २३ वर्ष रा. पाचनल चौक, रामबाग, नागपूर याचेकडुन विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. अ‍ॅक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे इमामवाडा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव इमामवाडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, सपोनि. आनंद बिचेवार, पोहवा. गणेश जोगेकर, ज्ञानेश्वर भोगे, विवेक आढाऊ, मपोहवा. अनुप यादव, पोअं. संतोष शेंद्रे, नितीन राठोड व चापोहवा. नितीन साळुंखे यांनी केली.



**३) सक्करदरा पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०६.१०.२०२६ चे ०२.२० वा. ते ०३.४५ वा. चे दरम्यान, सक्करदरा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना दत्तात्रय नगर फायर ब्रिगेड ऑफीसमागे, सक्करदरा लेक—गार्डनचे भिंतीजवळ एक इसम संशयीतरित्या दिसुन आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहून पळाल्याने, त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव कुणाल अशोक म्हैंसकर वय ३१ वर्षे, रा. संत चोखोबा शाळेजवळ, संत कबीर वार्ड, शिवाजी मार्केट समोर, हिंगणघाट, जि. नागपुर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचेजवळ एका झिपलॉक पन्नीमध्ये २० ग्राम एमडी पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल फोन, व रोख ७०/— रु. असा एकुण ७२,०७०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब)

एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे सक्करदरा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री महेश चव्हाण, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. रमेश खुणे व त्यांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— खुनाचा गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०५.१०.२०२६ चे २०.५० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, राहणाऱ्या फिर्यादीची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही आपले लहान भावासह घरी हजर असतांना, फिर्यादीचा पती याने दारुचे नशेत घरी येऊन, मुलीसोबत तिचे इच्छेविरुध्द तिचेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. त्यावर फिर्यादीचे मुलीने प्रतिकार केला असता, फिर्यादीचे पतीने दारुचे नशेत रागाचे भरात मुलीला शिवीगाळ करुन, हातबुक्कीने मारहाण करीत असता, फिर्यादीचे मुलीने त्याचे तावडीतुन सुटण्याकरीता बाजुला पडलेल्या लाकडी बॅटने फिर्यादीचे पतीचे डोक्यावर मारुन त्यास जिवानिशी ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. व्यंकटेश हनमंतु यांनी कलम १०३(१) भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीची मुलगी हिला ताब्यात घेतले असुन, ती अल्पवयीन असल्याने, पुढील योग्य ती कायदेशिर कार्यवाही सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे वाडी :— प्राणांतिक अपघाताचा गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०१.१०.२०२६ चे १४.०० ते १४.३० वा. चे दरम्यान, फिर्यादीचा भाऊ शेरसिंग दिपसिंग उईके वय २४ वर्ष रा. खमसिया वार्ड क्र. १६, ता. कटंगी जि. बालाघाट, ह.मु. लावा, वाडी, नागपूर हा त्याचे मोटार सायकल क्र. एमपी २२ झेडएच ७५०३ ने सोबत मित्र नामे सुखराम मडावी याचेसह डबलसीट जात असता, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, सोबनानगर—खडगाव रोडवरील द विदर्भ टोटल लॉजिस्टीक नावाचे दुकानासमोर, त्याने त्याचे ताब्यातील दुचाकी वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, त्याचे गाडीवरील संतुलन गेल्याने, गाडी स्लीप होऊन दोघेही खाली पडले. अपघातामध्ये वाहन चालक गंभीर जखमी झाला व मित्र किरकोळ जखमी झाला. गंभीर जखमी यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले. मित्र सुखराम याचा उपचार करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी लालसिंग दिपसिंग उईके वय २४ वर्ष रा. खमसिया वार्ड क्र. १६, ता. कटंगी जि. बालाघाट यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. संतोष शिरडोळे ८८८८७६५८३ यांनी दुचाकी चालक मृतकाविरूध्द कलम १०६(१),२८१,३२४(२) भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**